# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 22/11/2022 (मंगळवार) दुपार

---

## मालमत्तेचे नुकसान करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा दाखल

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील नाग मंदीर, वाघोडा येथे दिनांक २२/११/२०२२ चे ०१.०० वा. ते ०२.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– सुरेश मारोतराव चरपे, वय ५० वर्ष, रा. वार्ड क्र. ७, भगत ले आउट सावनेर ता. सावनेर याची मुलगी नामे–कु. प्रिया, वय २० वर्ष हिचे आरोपी नामे– गनी उर्फ पलाश वासनिक, रा. रामबाग नागपुर ह. मु. सावनेर याचे सोबत प्रेम संबंध होते. आरोपीने फिर्यादीला व त्याचे मुलीला लग्न करण्यासाठी म्हटले होते परंतु फिर्यादीने व त्याचे मुलीने त्यास लग्न करण्यास नकार दिल्याने यातील नमुद घटना वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीचे भाजीपाल्याचे दुकान तसेच भाजीपाला ठेवण्याचे १० बाय १० चे टिनचे शेड व अशोक ले लॅड चार चाकी माल वाहक गाडी क्र. एम. एच.–४०/बी. जी.–३०९१ भाजीपाला सहीत सुड भावनेतुन नुकसान व्हावे या उद्देशाने आग लावुन अंदाजे ७०,०००/– रूपयाचे नुकसान केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ४३५ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. अनिल तिवारी पोलीस स्टेशन सावनेर मो.क्र. ९६८९८९१४८६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर